
Historicity Research Journal
ISSN : 2393-8900
Impact Factor : 1.9152 (UIF)
Volume - 3 | Issue - 11 | July – 2017

# प. प. वासुदेवानन्दसरस्वती स्वामी विरचित मन्त्रगर्भ स्तोत्रे - एक अद्भुतरम्य व आव्हानात्मक काव्यप्रकार

रेवा कुलकर्णी
सहाय्यक प्रा., संस्कृत विभाग,
द.भै.फ. दयानन्द कला व शास्त्र महाविद्यालय, सोलापूर.



***प्रस्तावना :***

स्तोत्र वाङ्मय हा एक काव्यप्रकार आहे. याचे प्रयोजन 'शिवेतरक्षति:'[1] म्हणजे 'पापनाश होणे' असे आहे, असे साहित्यशास्त्रकार मम्मटाचार्य आपल्या 'काव्यप्रकाश' नामक ग्रंथात म्हणतात . वेदांमधील सूक्ते स्तोत्रांचे मूळ उगमस्थान आहेत.

**स्तोत्रांचे लक्षण -**

नमस्कारास्तथाशीश्च सिद्धान्तोक्तिः पराक्रमः ।
विभूतिः प्रार्थना चेति षड्विधं स्तोत्रलक्षणम् ॥

अर्थात् देवतांना नमस्कार देवतांची स्तुती, संसाराचे सत्यासत्यत्व, सिद्धान्त, पराक्रमाचे निवेदन, महान विभूतींचे वर्णन आणि प्रार्थना हे स्तोत्रांचे विषय होत. 'तत्त्वज्ञानान्निश्रेयसप्राप्ति:' या औपनिषदिक वचनानुसार मोक्ष मार्गासाठी प्रेरक, प्रेरक, मार्गदर्शक ज्ञानमार्ग तर स्तोत्रांमध्ये असतोच पण विशेष रूपाने येथे भक्तिमार्ग दृष्टीस पडतो. नवविधा भक्ति अर्थात् अर्थात् भक्ति करण्याचे नऊ मार्ग हे मार्ग जरी भिन्न भिन्न असले तरीही प्रयोजन एकच. ते म्हणजे ध्येय देवतेचे किंवा तत्त्वाचे नित्य किंवा सतत स्मरण! निदिध्यास!

'आत्मा वा अरे द्रष्टव्यः श्रोतव्यः मन्तव्यः निदिध्यासितव्यश्च ।'[2]

बृहदारण्यकोपनिषदात उल्लेखिलेल्यानुसार आत्मसंबंधी विचारांचा निदिध्यास होण्यास स्तोत्रवाङ्मय अत्यंत सहाय्यक आहे. यामुळेच अनेक संतांनी स्तोत्र रचना मोठ्या प्रमाणावर केलेली दिसते. श्रीमद् आद्यशंकराचार्यांची स्तोत्रे सर्वश्रुतच आहेत.

प.प. वासुदेवानन्द सरस्वती स्वामी महाराज हे महाराष्ट्रातील कोकण प्रांतातील माणगांव येथे होवून गेलेले १९ व्या व्या शतकातील संत व प्रकाण्ड पंडीत होत. त्यांचे प्रसाद गुणयुक्त प्रतिभासंपन्न काव्य म्हणजे संस्कृत भाषेला तसेच मराठी भाषेला लाभलेली पर्वणीच आहे. अलीकडच्या काळात इतके संपन्न व प्रभूत काव्य दुसरे आढळत नाही. स्वामी महाराज दत्त भक्त होते. आणि त्यांनी आपली वाणी दत्तात्रेयांना समर्पित केलेली होती. त्यामुळे स्तोत्र कोणत्याही देवतेला उद्देशून असो प्रत्येक स्तोत्रात कोणत्या ना कोणत्या प्रकारे दत्त भगवंताचा उल्लेख येतो. स्वामींची रचना विपुलतेने व विविधतेने नटलेली आहे. काव्य, स्तोत्रे, चम्पू, आरत्या, पदे, भूपाळी, आख्यान असे विविध वाङ्मय प्रकार आपल्याला पाहायला पाहायला मिळतात.

---

[1] काव्यप्रकाश १ उल्लास

[2] बृहदारण्यकोपनिषद

त्यांचे दत्ततादात्म्य इतके होते की सामान्यजन व परंपरेमध्ये स्वामींना दत्ताचा अवतारच मानले जाते. स्वामिमहाराजांच्या चरित्रात अनेक उल्लेख येतात की अनेक समस्याग्रस्त लोक त्यांच्याकडे उपाय मागण्यासाठी , त्यांची कृपा व्हावी म्हणून येत असत आणि त्यांवर उपाय म्हणून स्वामिमहाराज अनेक पद्यांची रचना करीत असत .

तर असे विपुल स्तोत्रवाङ्मय श्रीस्वामींनी रचलेले आहे . त्यांचा संग्रह 'स्तोत्रादिसंग्रह' नामक ग्रंथात मिळतो . स्वामींनी प्रतिज्ञापूर्वक आपली वाणी दत्तभगवंताला समर्पित केली आहे. तथापि स्तोत्रादिसंग्रहाच्या अनुक्रमणिकेवर नजर फ़िरवल्यास आपल्याला अनेक देवतांची स्तोत्रे आढळतात . केवल देवतांचीच नव्हे तर पंचायतनमहात्म्य , द्व्यर्थी स्तोत्रे , गंगा आदि नद्यांची आणि तीर्थक्षेत्रांचीही स्तोत्रे , वेदांत स्तोत्रे, नित्योपासनाक्रम , आरती ,पदे इ . विविध स्तोत्रे दिसतात . पण प्रत्येक स्तोत्रात युक्तिपूर्वक दत्त भगवंताचा उल्लेख मात्र सापडतो.

स्वामीमहाराजांची एक खास रचना आहे , ती म्हणजे मंत्रगर्भरचना ! म्हणजे स्तोत्रांमध्ये मंत्र पेरणे. स्तोत्रातील पहिले, दुसरे किंवा कोणतेही ठराविक अक्षर उभ्या क्रमाने जोडले असता एखादा मंत्र तयार होतो स्तोत्र हे स्तोत्राच्या अर्थप्रवाहानुसार असते आणि त्यात विविध मंत्र अर्थबाध न करता अत्यंत कौशल्याने गुंफलेले असतात. हेच यातले आव्हान असते. हा चित्रकाव्याचा प्रकार मानता येत नाही. कारण यामध्ये अर्थालाही तितकेच महत्त्व असते. अश्या प्रकारच्या प्रकारच्या रचनेचे मोरोपंत लिखित मंत्ररामायण हे एक उत्तम उदाहरण आहे. स्वामींच्या वाङ्मयात ही रचना भरपूर प्रमाणात प्रमाणात आढळते. विनायक स्तोत्रात दत्त गायत्री, गणेश गायत्री,रुद्र गायत्री वासुदेवानंदसरस्वतीविरचितविनायकस्तोत्रमिदं समन्त्रकम् अशी गुंफण दिसते रामस्तोत्रात जय राम जय जय राम असे गुंफलेले आहे. याप्रमाणे अनेक देवता व नद्यांच्या नद्यांच्या स्तोत्रातही मोठ्या प्रमाणावर मंत्र दिसतात.

उदाहरणादाखल सरस्वती नदीचे स्तोत्र पाहू या. सरस्वती ही नदी आहे आणि देवताही ! त्यामुळे स्तोत्रांमध्येही सरस्वतीची ही दोन्ही रूपे आढळतात.

या स्तोत्रात एकूण १२ श्लोक किंवा पद्ये आहेत . श्लोकातील प्रथम, पाचव्या व बाराव्या अक्षरांमध्ये रचनाकार आणि मंत्र यांची गुंफण दिसते .

| | | |
|---|---|---|
| वा ग्वादिनी | पा पहरासि भेद | चो द्यादिकं मद्वर दिव्यमूर्ते ।[3] |
| सु शर्मदे | व न्दयपदेस्तुवित्ता | द याचतेहो मयि पुण्यकीर्ते ॥१॥ |
| दे व्यै नमः | का लजितेस्तमात्रेऽ | यी सर्वभा अस्यखिलार्थ दे त्वम् । |
| वा सोत्र ते | नः स्थितये शिवा | त्री सस्य पूर्णस्य कलासि सा त्वम् ॥ २ ॥ |
| नं दप्रदे | स त्यसुतेऽभवाय | सू क्ष्मां धियं सम्प्रति मे विधेहि । |
| द यस्वा सा | र स्वजलाधिसेवि | नृ लोकपेरम्मयि संनिधेहि ॥ ३ ॥ |
| स त्यं सर | स्व त्यासि मोक्षसद्म | ता रिण्यसि स्वस्य जनस्य भर्म । |
| र मयं हि ते | ती रमिदं शिवाहे | नां गीकरोतीह पतेत्स मोहे ॥ ४ ॥ |
| स्व भूतदे | वा धिहरेस्मि वा अ | चे ताअपि प्रज्ञ उपासनात्ते । |
| ती व्र व्रतैर् | जे तुमशक्यमेव | तं निश्चलं चेत इदं कृत ते ॥ ५ ॥ |
| वि चित्रवाग् | भि र्ज गुरुनसाधू | ती र्थाश्रयां तत्वत एव गातुम् । |
| र जस्तनु | र्वा क्षमतेध्यतीता | सु कीर्तिरायच्छतु मे धियं सा ॥ ६ । |
| चि त्रांगि | वा जि न्यघनाशिनीय | म सौ मुमूर्तिस्तव चाम्मयीह |
| त मोघहं | नी रमिदं यदाधी | ती तिन्घमे केऽपी नते त्यजन्ति ॥ ७ ॥ |
| स दयोगिभा | व प्रतिमं सुधाम | नां दीमुखं तुष्टिदमेव नां । |
| मं त्रोव्रतं | ती र्थमतोधिकं हि | य न्मे मतं नास्त्यत एव पाहि ॥ ८ ॥ |
| त्र यीतपो | य ज्ञमुखा नितांतं | ज्ञं पांति णा धिघ्न इमेऽज्ञमार्ये । |

[3] स्तोत्रादिसंग्रह

क स्तवल्पसं ज्ञं हि दयेत यो नो द यार्हयार्योझ्झित इशवर्ये ॥ ९ ॥
स मस्तदे व र्षिनुते प्रसीद धे त्व्यस्यके विश्वगते करंते ।
र क्षस्व मु ष्टु त्युदिते प्रमत्तः स त्यं न विश्वान्तर एष मत्तः॥ १० ॥
स्व ज्ञं हि मां धि क्कृतमत्र विप्र र त्नैर्वरं विप्रतरं विधेहि ।
ती क्ष्णद्युतेर् या धिरुगिष्टवाचो स्व स्थाय मे रात्विति ते रिरीहि ॥ ११ ॥
स्तो तुं न चै व प्रभुरस्मि वेद ती र्थाधिपे जन्महरे प्रसीद ।
त्र पैव यत् सु ष्टुतयेस्त्यपायात् सा जाड्याह्नतिप्रियदा विपद्भ्यः ॥ १२ ॥

प्रत्येक ओळीचे प्रथम अक्षर घेतल्यास 'वासुदेवानंद सरस्वती विरचित समंत्रकसरस्वती स्तोत्र' असे रचनाकाराचे व स्तोत्राचे नांव तयार होते .

याच प्रकारे पाचवे अक्षर घेतले असता 'पावका नः सरस्वती वाजेभिर्वाजिनीवती यज्ञं वष्टु धियावसुः' तयार होते

तसेच बारावे अक्षर घेतल्यास 'चोदयित्री सूनृतानां चेतन्ती सुमतीनां यज्ञं दधे सरस्वती' तयार होते . या प्रकारे मंत्रांची गुंफण केलेली दिसते. यामुळे वेदोक्त मंत्रांचा लाभही होतो आणि त्यांच्या अवघडपणाचा सामनाही करावा लागत नाही. तेव्हा परमकारुणिक स्वामींनी या प्रकारे मंत्रांची गुंफण करून आपले विलक्षण रचना कौशल्य प्रगट केले आहे.

### संदर्भ ग्रंथ –


- स्तोत्रादिसंग्रह श्रीवासुदेव निवास , पुणे १९५२
- काव्यप्रकाश मम्मटाचार्य चौखम्भा प्रकाशन, वाराणसी १९९८
- काव्यप्रकाश का दार्शनिक धरातल डॉ बालकृष्णशर्मा प्रतिभा प्रकाशन दिल्ली १९९७ ८१-८५२६८-६९-x
- गीर्वाणलघुकोश ज.वि.ओक आनन्दलाटकर कॉम्प्ट. , कल्पना प्रा.लि.पुणे ३०, २००२
- मूकपञ्चाशती डॉ. प्रमोद गणेश लाळे जगदीश पोद्दार मुम्बापुरी २०१२
- उपनिषद्भाष्यम् श्रीमदाद्यशंकराचार्याः आष्टेकर ,पुणे – १९२७
- www.vasudevanandsarasvati.com